आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता
१४ डिसेंबर २०२५ - सोमवार

**ठळक बातम्या**

- दिल्लीच्या रामलीला मैदानावर झालेल्या काँग्रेसच्या सभेत प्रधानमंत्र्यांविषयी आक्षेपार्ह विधानं झाल्याचा भाजपाचा आरोप / संसदेत सत्ताधारी सदस्यांचा गदारोळ

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी जॉर्डन, इथिओपिया आणि ओमान या ३ देशांच्या दौऱ्यावर रवाना

- देशाचे पहिले गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांच्या ७५व्या पुण्यतिथीनिमित्त देशाची आदरांजली

- देशाचे नवीन मुख्य माहिती आयुक्त म्हणून राजकुमार गोयल यांचा शपथविधी

आणि

- देशाच्या उत्तर भागात बहुतांश ठिकाणी दाट धुकं / दिल्लीत कमी दृष्यमानतेमुळे विमान वाहतुकीवर परिणाम

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्याबद्दल काँग्रेस नेत्यांनी आक्षेपार्ह वक्तव्य केल्याचा आरोप करुन काँग्रेसने माफी मागावी अशी मागणी करत, सत्ताधारी पक्षाच्या खासदारांनी आज संसदेत गदारोळ केला. घोषणाबाजी सतत चालू राहील्यामुळे लोकसभेचं कामकाज आधी १२ वजेपर्यंत आणि नंतर दुपारी दोन वाजेपर्यंत तहकूब करण्यात आलं.

सभागृहाचे दिवंगत सदस्य सुभाष आहुजा, सलाहुद्दिन आणि बालकृष्ण चौहा यांना आज आदरांजली वाहण्यात आली.

दिल्लीच्या रामलीला मैदानावर काल झालेल्या काँग्रेसच्या सभेत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्याबद्दल आक्षेपार्ह वक्तव्य केल्याचा मुद्दा संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी आज लोकसभेचं कामकाज सुरू झाल्यावर उपस्थित केला. अशा प्रकारचं वक्तव्य हे दुर्दैवी आणि लाजिरवाणं आहे असं रिजिजू म्हणाले. यानंतर सत्ताधारी पक्षाच्या खासदारांनी घोषणाबाजी सुरू केली, गोंधळ वाढत गेल्यामुळे सभापती ओम बिर्ला यांनी सभागृहाचं कामकाज दुपारी बारा वाजेपर्यंत तहकूब केलं.

त्यानंतर दुपारी बारा वाजता कामकाज पुन्हा सुरू झाल्यावर सत्ताधारी सदस्यांनी घोषणाबाजी सुरूच ठेवली आणि  कामकाज दुपारी दोन वाजेपर्यंत तहकूब करण्यात आलं.

राज्यसभेतही या मुद्यावरुन गदारोळ झाला. आक्षेपार्ह वक्तव्याबद्दल काँग्रेसने माफी मागावी अशी मागणी सभागृह नेते जे पी नड्डा यांनी  केली. त्यानंतर घोषणांचा गदारोळ वाढत गेल्यानं उपाध्यक्ष हरिवंश यानी सभागृहाचं कामकाज १२ वाजेपर्यंत तहकूब केलं.

दरम्यान, संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्यावर केलेल्या कथित आक्षेपार्ह टिप्पणीचा संसदेच्या आवारात वार्ताहरांशी बोलताना निषेध केला. राहुल गांधी आणि मल्लिकार्जुन खरगे  यांनी दोन्ही सभागृहांमधे माफी मागावी अशी मागणी त्यांनी केली.  भाजपा आणि रालोआ कधीही कुणाचाही अपमान करत नाहीत असं ते म्हणाले…

**- - - होल्ड बाईट रिजिजू - -**

**- <><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज जॉर्डन, इथिओपिया आणि ओमान या ३ देशांच्या दौऱ्यावर रवाना झाले. सर्वप्रथम ते जॉर्डनला भेट देतील. या भेटीत ओमानचे राजे अब्दुल्ला द्वितीय इब्न अल हुसेन आणि प्रधानमंत्री  जफर हुसेन यांच्याशी चर्चा करणार असल्याचं मोदी यांनी रवाना होताना  सांगितलं. याशिवाय ते जॉर्डनमधल्या भारतीय समुदायाचीही भेट घेणार आहेत.

प्रधानमंत्री उद्या इथिओपियाची राजधानी आदिस अबाबा कडे रवाना होतील. तिथं ते इथिओपियाच्या प्रधानमंत्र्यांना भेटून चर्चा करतील, तिथल्या संसदेच्या दोन्ही सभागृहांच्या संयुक्त बैठकीला संबोधित करतील. तिथल्या  भारतीय समुदायाशी देखील मोदी  संवाद साधतील.

दौऱ्याच्या शेवटच्या टप्प्यात येत्या बुधवारी मोदी ओमानची राजधानी मस्कतला जातील. भारत आणि ओमान यांच्यातल्या परस्पर संबंधांना ७० वर्ष पूर्ण होत असताना प्रधानमंत्र्यांची ही भेट  विशेष ठरणार आहे. प्रधानमंत्री या भेटीत ओमानचे सुलतान हैतम बिन तारीक़ अल साईद यांची भेट घेतील तसंच मस्कतमधल्या भारतीय समुदायाशी संवाद साधतील.

**<><><><><>**

देशाचे पहिले गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांच्या ७५व्या पुण्यतिथीनिमित्त देश त्यांना अभिवादन करत आहे.

सरदार पटेल यांनी स्वातंत्र्यानंतर देशातल्या अनेक संस्थानंचं विलनीकरण करून एकसंध भारताच्या निर्मितीत अमूल्य योगदान दिलं, असं उपराष्ट्रपती सी पी राधाकृष्णन यांनी आपल्या आदरांजली संदेशात म्हटलं आहे. पटेल यांची विचारधारा हीच एक भारत श्रेष्ठ भारत अभियानाची प्रेरणा असल्याचंही ते म्हणाले.

लोहपुरुष सरदार पटेल यांनी देशाला एका सूत्रात बांधण्यासाठी आपलं जीवन समर्पित केलं, अशा शब्दात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी त्यांना आदरांजली वाहिली. अखंड आणि अभेद्य भारताच्या निर्मितीत सरदार पटेलांनी दिलेल्या योगदानासाठी ते कायम देशवासीयांच्या स्मरणात राहतील, असं मोदी यांनी समाज माध्यम संदेशात म्हटलं आहे.

सरदार पटेल यांनी देशांतर्गत स्थिरता शांतता स्थापित करण्याला आपला जीवन उद्देश बनवलं होतं, असं केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी आपल्या समाज माध्यम संदेशात म्हटलं आहे.

**<><><><><>**

देशाचे नवीन मुख्य माहिती आयुक्त म्हणून राजकुमार गोयल यांनी आज शपथ घेतली. नवी दिल्लीत राष्ट्रपती भवन इथं झालेल्या कार्यक्रमात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी गोयल यांना पदाची शपथ दिली.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली ३ जणांच्या समितीने गोयल यांच्या नावाची शिफारस गेल्या आठवड्यात या पदासाठी केली. राजकुमार गोयल हे भारतीय प्रशासकीय सेवेच्या १९९० च्या तुकडीतले अधिकारी असून केंद्रसरकारच्या न्याय विभागाचे सचिव म्हणून गेल्या ऑगस्टमधे सेवानिवृत्त झाले. या समितीने इतर ८ आयुक्तांची नावंही सुचवली असून, तब्बल ९ वर्षांनंतर माहिती आयोगात सर्व आयुक्तांची पदं भरली आहेत.

**<><><><><>**

घाऊक किंमत निर्देशांकावर आधारित चलनफुगवट्याचा दर नोव्हेंबरमधे ऑक्टोबरच्या तुलनेत ८९ शतांशांनी वाढून उणे ३२ शतांश टक्के राहिला. ऑक्टोबरमधे हा दर उणे १ पूर्णांक २१ शतांशांवर होता.

<><><><><>

DARPG अर्थात प्रशासकीय सुधारणा आणि सार्वजनिक तक्रार निवारण विभागाने केंद्रीय मंत्रालयं आणि विभागांच्या कामगिरीची देखरेख प्रणाली आणि केंद्रीकृत सार्वजनिक तक्रार निवारणाचा नोव्हेंबर महिन्यासाठीचा ४३ वा मासिक अहवाल जाहीर केला आहे. यावर्षी नोव्हेंबर महिन्यात केंद्रीय मंत्रालयं आणि विभागांनी ४२ हजार तक्रारींचं निवारण केलं, असं यात म्हटलं आहे. दूरसंचार विभाग, टपाल, अप्रत्यक्ष कर आणि सीमाशुल्क मंडळ हे अ श्रेणीत पहिल्या क्रमां◌ंकावर आहेत,  तर संसदीय कामकाज विभाग, ऊर्जा आणि कोळसा मंत्रालय ब श्रेणीत पहिल्या क्रमांकावर आहेत, असं या अहवालात म्हटलं आहे.

<><><><><>

महाराष्ट्रात राज्य निवडणूक आयोगानं आज दुपारी ४ वाजता वार्ताहर परिषद बोलावली आहे. राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यावेळी वार्ताहरांशी संवाद साधणार आहेत. महानगरपालिकांच्या प्रलंबित निवडणुकांचा कार्यक्रम यावेळी जाहीर  होण्याची शक्यता आहे.

<><><><><>

इंडिगोच्या विमानसेवांमध्ये निर्माण झालेल्या अनियमिततेबद्दलची जनहित याचिका दाखल करून घ्यायला सर्वोच्च न्यायालयानं आज नकार दिला. यासंदर्भात दिल्ली उच्च न्यायालयात आधीच सुनावणी सुरू असल्याची नोंद सरन्यायाधीश न्यायमूर्ती सूर्य कांत, न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची आणि न्यायमूर्ती विपुल पंचोली यांच्या पीठानं घेतली आणि याचिकाकर्त्याला दिल्ली उच्च न्यायालयातल्या सुनावणीत सहभागी व्हायची मुभा दिली.

<><><><><>

ऑस्ट्रेलियात सिडनी इथं बाँडाय बीचवर गोळीबार करणारे दोन हल्लेखोर वडील-लेक असून हे दोघे मूळचे पाकिस्तानातल्या लाहोरचे असल्याची माहिती न्यू साऊथ वेल्सच्या पोलिसांनी दिली आहे. पोलिसांनी प्रत्युत्तरादाखल केलेल्या गोळीबारात यापैकी वडिलांचा मृत्यू झाला, तर मुलगा जखमी झाला असून त्याच्यावर उपचार सुरू आहेत. या दोघांनी केलेल्या अंदाधुंद गोळीबारात १६ जणांचा मृत्यू झाला होता.

<><><><><>

भारत आणि दक्षिण आफ्रिकेदरम्यान काल धरमशाला इथं झालेल्या मर्यादित ट्वेंटी ट्वेंटी क्रिकेट सामन्यांत भारताने दक्षिण आफ्रिकेवर सात गडी राखून विजय मिळवला. दक्षिण आफ्रिकेने दिलेल्या ११८ धावांच्या उद्दिष्टाचा पाठलाग करताना भारताने १५ षटकं आणि ५ चेंडूत तीन बाद १२० धावा केल्या. अवघ्या १३ धावा देऊन २ गडी बाद करणारा अर्शदीप सिंग सामनावीर ठरला.  पाच सामन्यांच्या मालिकेत भारतीय संघ २-१ असा आघाडीवर आहे.

मालिकेतील चौथा सामना येत्या बुधवारी लखनौमध्ये होईल.

**<><><><><>**

अर्जेंटिनाचा फुटबॉलपटू लिओनेल मेस्सीचा GOAT इंडिया दौऱ्याच्या चौथ्या आणि अंतिम टप्प्याचा कार्यक्रम आज दिल्लीच्या अरुण जेटली मैदानावर होणार आहे. यावेळी मेस्सी तीन युवा ट्रॉफी जिंकणाऱ्या मिनर्वा अकादमीच्या संघांचा सत्कार करणार आहे. तसंच काही मान्यवर खेळाडू फुटबॉलचा सामना देखील खेळणार आहेत.

**<><><><><>**

देशाच्या बहुतांश भागात थंडीचा कडाका वाढला असून दिल्ली, चंडीगड, हरियाणा, हिमाचल प्रदेश, पंजाब, उत्तर प्रदेश, पूर्व मध्यप्रदेश, विदर्भ,उत्तर महाराष्ट्र आणि ईशान्येकडच्या राज्यांमधे दाट धुकं पसरलं आहे. हीच स्थिती उद्यापर्यंत कायम राहण्याची शक्याता आहे. धुक्यामुळे दृष्यमानता कमी होऊन हवाई वाहतुकीवर परिणाम झाला आहे. सुमारे ६० उड्डाणं रद्द झाली आहेत, तर ५ उड्डाणांचे मार्ग बदलले आहेत. प्रवाशांनी विमानकंपन्यांशी संपर्कात रहावं असा सल्ला दिल्ली विमानतळ प्राधिकरणानं दिला आहे.

दिल्लीत ग्रेप योजनेचा चौथा टप्पा लागू केला असून शाळा अंशतः उपस्थिती पद्धतीनं चालवण्याचे निर्देश प्रशासनानं दिले आहेत.

**//<><><><><>//**